I O

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** विश्राम बाग  **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0104  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/03/2022 05:34 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार  **Date From (दिनांक पासून):** 05/03/2022
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/03/2022
   **Time Period (कालावधी):** पहर 6  **Time From (वेळेपासून):** 16:56 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:56 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 06/03/2022  **Time (वेळ):** 04:55 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 004  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/03/2022 04:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मराविवि कंपनी उप विभाग ,विश्रामबाग सांगली

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** प्रशांत दताजीराव पाटील

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978  **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लेण्याद्री बंगला, प्लट नं21,रोड नं2 मराविमं हौसींग सोस,80 फुटी रोड,विश्रामबाग सांगली, विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लेण्याद्री बंगला, प्लट नं21,रोड नं2 मराविमं हौसींग सोस,80 फुटी रोड,विश्रामबाग सांगली, विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेंद्र आनंदराव देसाई | | | 1. किंगकोर्ट अपार्टमेंट, ,फलट नं एफ-3, , शिवाजी पाक, कोल्हापूर वर्ग-1,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब ता.06.03.2022मी प्रशांत दत्ताजीराव पाटील वय 44 वर्ष व्यवसाय बांधकाम कंत्राटदार रा.लेण्याद्री बंगला,प्लट नं 21, रोड नं-
2, म.रा.वि.वि हौ-सो, विश्रामबाग सांगली मो.नं 9175055755 मी वरील प्रमाणे असून गेले 17 वर्षापासून ग्.च्.क.ृ.क्.ख्.
कंपीनीमधील बांधकाम विषयी कंत्राट पध्दतीने कामे करीत आहे. त्याप्रमाणे मी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी विभागीय कार्यालय
(स्थापत्य) कोल्हापूर यांचेकडून दैनंदीन स्थापत्य कामाचे देखभाल ही कामे केली असून त्यांचे बिलांची मिळालेली व येणे असलेल्या बिलांची
माहीती पुढीलप्रमाणे,1)निविदा क्रमांक 373 दि.26.02.2020 हे काम दि.26.02.2020 रोजी सुरू करून दि.25.08.2020 रोजी पुर्ण
केले असून या कामाचे 8,79,181/- रूपयाचे काम झाले असून त्यापैकी 4,93,170/- रूपये मला फेब्रा◌ुवारी 2022 मध्ये मिळाले असून
386011/- रूपये बिलाची रक्कम अद्याप मिळालेली नाही. 2)निविदा क्रमांक 457 दि.31.03.2021 हे काम दि.07.04.2021 रोजी
सुरू करून दि.06.10.2021 रोजी पुर्ण केले आहे. या कामाचे अंदाजे 6,41,262/- रूपये बिल झाले असून या बिलाची रक्कम अद्याप
मिळालेली नाही. 3)निविदा क्रमांक 1431 दि.22.08.2019 या कामाचे 7,95,087/- रूपयाची वर्क ऑर्डर असून या कामाच्या बिलाची
अंदाजे 4,02,465/- रूपये मला मिळाले आहेत. वरील प्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी विभागीय कार्यालय (स्थापत्य) कोल्हापूर
यांचेकडून निविदेप्रमाणे दैनंदीन स्थापत्य कामाचे देखभाल ही कामे मी पुर्ण केली असून त्यामधील बिलांपैकी एकूण 8,95,635/- रूपये बिल
मला मिळाले असून 10,27,273/- रूपये मला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी विभागीय कार्यालय (स्थापत्य) कोल्हापूर यांचेकडून येणे
बाकी आहेत. तसेच वरील कामांमध्ये पुर्वी घेतलेल्या कामांची अनामत रक्कम तसेच सुरक्षा ठेव रक्कम व अगावू काम (अडव्हान्स वर्क) करून
घेतलेल्या कामांमधील वेगवेगळ्या रक्कमा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी विभागीय कार्यालय (स्थापत्य) कोल्हापूर यांचेकडून येणे बाकी
आहेत.माझे वरील प्रमाणे काम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी विभागीय कार्यालय (स्थापत्य) कोल्हापूर येथे प्रलंबीत असल्याने मी वारंवार
विभागीय कार्यालय (स्थापत्य) कोल्हापूर येथे जावून श्री.देसाई, कार्यकारी अभियंता यांची भेट घेतलेली आहे. तसेच सदर प्रलंबीत बिलांच्या
कामाबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उप विभागीय कार्यालय विश्रामबाग सांगली येथे चौकशी केलेली आहे. परंतू माझे बिलांचे काम
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी विभागीय कार्यालय (स्थापत्य) कोल्हापूर येथे प्रलंबीत आहे. श्री.देसाई, कार्यकारी अभियंता हे मी केलेल्या
कामांची बिले मंजूर करून देत नसल्याने मी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी प्रकाशगड बांद्रा तसेच उर्जामंत्री सा◌ो तसेच सी.आय.ओ
धारावी यांचेकडे देसाई यांनी आडवून ठेवलेल्या कामांसंदर्भात तक्रार केली आहे. तसेच श्री.देसाई, कार्यकारी अभियंता यांनी निविदा क्र.0461
दि.31.03.2021 ताराबाई पार्क कोल्हापूर येथील नुतनीकरणाच्या कामाचा कार्यादेश मला दिला होता. परंतू श्री.देसाई, कार्यकारी अभियंता
यांनी अवैद्यरित्या सदर कामामधील सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्याचे बँकेला आदेश दिले होते. त्याकरणाने मी मंत्रालयामध्ये तक्रार दिली होती.



Scanned with CamScanner

दि.18.02.2022 रोजी मी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी विभागीय कार्यालय (स्थापत्य) कोल्हापूर या ठिकाणी जावून श्री.देसाई, कार्यकारी अभियंता यांची भेट घेवून मी केलेल्या कामांची प्रलंबीत बिले मंजूर करून देण्याबाबत तसेच मी केलेल्या कामांमधील अनामत रक्कम तसेच सुरक्षा ठेव रक्कम व आगाऊ काम (अडव्हान्स वर्क) करून घेतलेल्या कामांमधील बिले मंजूर करून देण्याबाबत विनंती केली त्यावेळी श्री. देसाई, कार्यकारी अभियंता यांनी राहीलेली बिले मंजूर करून देण्यासाठी तसेच मला वरील प्रमाणे पुर्वी मंजूर करून दिलेल्या बिलांचा मोबदला म्हणून 3,00,000/- रूपये द्यावे लागतील असे सांगीतले. मला त्यांना 3,00,000/- रूपये देण्याची इच्छा नसल्याने मी त्या ठिकाणावरून निघून आलो होतो. श्री.देसाई, कार्यकारी अभियंता हे माझ्याकडून 3,00,000/- रुपये घेतल्याशिवाय मी केलेल्या कामांमधील उर्वरीत बिल मंजूर करून देणार नसल्याची माझी खात्री झाल्याने व मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि.28.02.2022 रोजी अन्टी करप्शन ब्युरो सांगली या ठिकाणी हजर राहून श्री. घाटगे पोलीस उप अधीक्षक अन्टी करप्शन ब्युरो सांगली यांची समक्ष भेट घेवून त्यांना माझ्या तक्रारीबाबत माहिती दिली. त्यावेळी घाटगे साहेबांनी दिले सूचनेप्रमाणे मी माझा तक्रारी अर्ज त्यांचे समक्ष हजर केला. त्यानंतर माझा तक्रारी अर्ज त्यांनी वाचून त्यावर सही केली. त्यानंतर घाटगे साहेब यांनी मला दि.02.03.2022 रोजी 10.00 वाजता त्यांचे कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना देवून मला जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे निघून गेलो.दि.02.03.2022 रोजी मी सकाळी 8.55 वाजता श्री.देसाई कार्यकारी अभियंता यांना माझ्या मोबाईलवरून त्यांचे मोबाईल क्रमांकावर संपर्क करून भेटण्यास येणार असल्याचे कळविले होते. त्यावेळी देसाई साहेबांनी मला सायंकाळी सात नंतर विभागीय कार्यालय कोल्हापूर येथील शासकीय विश्रामगृहात येण्याबाबत सांगीतले होते. त्याप्रमाणे मी घाटगे साहेब यांना कळविले होते. त्यावेळी घाटगे साहेब यांनी मला सायंकाळी साडेसहा वाजण्याचे सुमारास कोल्हापूर येथील शाहू मार्केटयार्ड जवळ येण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे दि.02.03.2022 रोजी सायंकाळी साडे सहा वाजण्याचे सुमारास कोल्हापूर येथील शाहू मार्केटयार्ड जवळ हजर होवून घाटगे साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी घाटगे साहेब त्यांचे कडील शासकीय वाहनासह हजर होते. त्यावेळी घाटगे साहेब यांनी त्यांचे सोबत आलेल्या दोन पंचाची ओळख करून दिली. तसेच त्यांचे पथकाचीही ओळख करून दिली. त्यानंतर घाटगे साहेबांनी दोन पंचा पैकी प्रशांत गजानन गुरव यांनी पंच नं. 1 म्हणुन व अरूण नारायण भिसे यांना पंच नं. 2 म्हणुन काम करण्याचे ठरवीले व माझा तक्रारी अर्ज पंचाना वाचणेस दिला. तो त्यांनी वाचून त्यावर सह्या केल्या. त्यानंतर घाटगे साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकर्डर बाबत माहिती देवून डिजीटल व्हाईस रेकर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर घाटगे साहेब यांनी पडताळणी कामी मला व पंच गुरव यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर घाटगे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करून तो माझेकडे दिला. तो मी माझे पन्टचे समोरील डावे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच गुरव असे माझ्याकडील होन्डा अमेज एम.एच.10 सीएक्स 3393 या कारमधून रवाना होवून ताराबाई पार्क या ठिकाणी असलेले म.रा.वि.वि.कंपनी शासकीय विश्रामगृह या ठिकाणी दाखल होवून मी पार्कींग ठिकाणी माझी कार पार्क केली. त्यानंतर मी देसाई साहेब यांना कल करून मी आलो असल्याचे सांगीतले. त्यावर देसाई साहेब यांनी मला विश्रामगृहातील डायनिंग मध्ये थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी व पंच गुरव असे विश्रामगृहातील डायनिंग हलमध्ये थांबून राहीलो काही वेळानंतर देसाई साहेब व त्यांचे सोबत जुनीअर इंजीनीअर विश्वजीत कांबळे असे आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. देसाई साहेबांना मी माझ्या सोबत असलेले पंच गुरव यांची मामा म्हणून ओळख सांगीतली. काही वेळ आमचेत आवांतर चर्चा झाली. त्यानंतर देसाई साहेब यांनी मला एस.डी.ची रक्कम (सुरक्षा ठेव रक्कम) रद्द न करता परत मिळवून देतो असे म्हणून दसाई यांनी मला करोना मुळे काम करणे शक्य झाले नाही, आता मटेरीअलचे रेट वाढले आहेत, मी काम करू शकत नाही त्यामुळे माझी सुरक्षा ठेव रद्द न करता मला ती परत मिळावी हि नम्र विनंती अशा आशयाचे पत्र लिहून दे असे त्यांनी सांगीतले. त्यावर मी त्यांना ठिक आहे असे म्हणालो. तसेच देसाई साहेब यांनी मला मी देसाई साहेब यांचेविरूध्द मुख्य अभियंता व मंत्रालयात केलेला तक्रारी अर्ज काढून घेणेस सांगीतला व देसाई साहेब यांनी मला सी.ई म्हणजेच मुख्य अभियंता यांनी व मंत्रालयातून कोणतीही कारवाई होणार नाही असे सांगीतले पाहीजे व एस.डी काढून देण्याबाबत सांगीतले पाहीजे असे म्हणाले. देसाई साहेब यांनी मी मंत्रालयात सुरक्षा रक्कमे संदर्भात केलेल्या तक्रारी संदर्भात चर्चा केली परंतू माझ्या प्रलंबीत कामा संदर्भात चर्चा केली नाही मी देसाई साहेब यांना माझ्या बिला संदर्भात विचारले असता त्यांनी मला हसबे साहेबांकडून करून घ्या मी सांगतो असे म्हणाले. त्यावेळी देसाई साहेबांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली नाही. आमचेतील चर्चा झाल्यांनतर मी व पंच गुरव त्या ठिकाणावरून निघून घाटगे साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो. घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर काढून त्यांचे ताब्यात दिला. त्यांनी तो बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर घाटगे साहेब यांनी पंच गुरव व मला पडताळणीची हकिगत विचारली असता आम्ही घडलेली सविस्तर हकिगत सांगीतली. त्यानंतर घाटगे साहेब, दोन्ही पंच व मी असे आम्ही मिळून डिजीट व्हाईस रेकर्डरमधील संभाषण ऐकले.त्यानंतर घाटगे साहेब यांनी मला श्री.देसाई यांचा निरोप आल्यानंतर तात्काळ कळविण्याबाबत सुचना देवून त्यांनी मला जाण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी निघून आलो.त्यानंतर दि.05.03.2022 रोजी सकाळी 11.13 वाजता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उप विभागीय कार्यालय विश्रामबाग सांगली येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी मला संपर्क करून देसाई साहेब सांगली येथील कार्यालयाच्या विश्रामगृहात येणार असल्याचे सांगून त्यांनी भेटण्यास सांगीतले असल्याचा निरोप दिला. त्याप्रमाणे मी घाटगे साहेब यांना कळविले. घाटगे साहेब यांनी मला स्फुर्ती चौक, विश्रामबाग येथील 80 फुटी रोडवर हजर राहण्याबाबत सुचना दिल्या. माझे राहते घर सदर ठिकाणापासून जवळच असल्याने घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे स्फुर्ती चौक, विश्रामबाग येथील 80 फुटी रोडवर हजर राहलो. त्यानंतर काही वेळाने घाटगे साहेब, दोन्ही पंच व त्यांचे पथक त्यांचेकडील शासकीय वाहनाने मी थांबले ठिकाणी आले. मी घाटगे साहेब यांची भेट घेतली.त्यानंतर घाटगे साहेबांनी दोन पंचा पैकी अरुण नारायण भिसे यांनी पंच नं. 1 म्हणुन व प्रशांत गजानन गुरव यांना पंच नं. 2 म्हणुन काम करण्याचे ठरवीले.त्यानंतर घाटगे साहेब यांनी श्री.देसाई,कार्यकारी अभियंता यांची पडताळणी करण्याचे निश्चित करून घाटगे साहेब यांनी मला व पंच भिसे यांना पडताळणी कामी सुचना दिल्या. त्यानंतर घाटगे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. त्यानंतर घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच भिसे असे माझ्याकडील कारने रवाना होवून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उप विभागीय कार्यालय विश्रामबाग सांगली येथील विश्रामगृहा जवळ जावून मी माझी कार पार्क केली. त्यानंतर मी व पंच भिसे असे पायी चालत विश्रामगृहात गेलो. सदर ठिकाणी असले रूम नं 1 मध्ये श्री.देसाई साहेब व हसबे साहेब सदर रूममध्ये हजर होते. सदर ठिकाणी काही वेळातच माझ्या सोबतचे कंत्राटदार मयुर चंद्रकांत मठद व प्रणव मोहन भिसे असे रूम नं 1 मध्ये आले. पंच भिसे हे रूमच्या चौकटीजवळ थांबले. मी, मयुर चंद्रकांत मठद व प्रणव मोहन भिसे असे देसाई साहेब यांचे बाजूस असले सोफ्यावर बसलो. प्रणव भिसे यांनी देसाई साहेब यांना आम्ही आमचे कामाबाबत सेप्रेट बोलतो असे म्हणाले. त्यावर देसाई साहेब यांनी आम्हाला मी संगळ्याशी बोलणार, आपले बोलणे झाल्यावर नंतर बोलू असे म्हणाले. त्यानंतर देसाई साहेब यांनी आम्हाला तुमची बिले मी अडवली आहेत, तुम्ही सत्ते पुढे शाहणपणा करू नका, मी काय मंत्र्यांच्या दबावामध्ये काम करीत नाही, तुम्ही काम केले आहे म्हणून मी बिल देत आहे,तुम्ही काय तक्रार केली आहे त्याला काय आम्ही दाद देत नव्हतो, वरची सगळी आमचीच आहेत, डिपार्टमेंट शेवटी डिपार्टमेंटच्याच लोकांना मदत करणार,दोन वर्ष झाली तरी तुम्हाला एक रूपाया



Scanned with CamScanner

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** SATISH TANAJI VAGARE
**Rank (पद):** HC (Head Constable)
**No.(क्र.):** PSMH26739 **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Pitirpd

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** KALLAPPA SATU PUJARI
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

पोलीस इन्स्पेक्टर ऑफिसर
विश्रामबाग पोलीस स्टेशन, सांगली.



Scanned with CamScanner